**ANNEXURE –D**

अहवाल                                                    दिनांक : ३०/०७/२०१९

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एम.बी.ए/ एम.एम.एस या अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेत विद्यार्थ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रवेश घेतल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल...

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना काही विद्यार्थ्यांकडून तसेच संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या नामांकीत संस्थेतील एम.बी.ए/एम.एम.एस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतल्याबाबतच्या तक्रारी व सुचना या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. सदर प्रकरणी या कक्षाने नोंद घेतलेली असुन सदर बाब मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना निदर्शनास आणुन दिलेली असून मार्गदर्शन मागितले. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रवेश प्रक्रिया समितीने (तंत्रशिक्षण विभाग) सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकांची तपासणी करुन खात्री करण्यात आली. तसेच तात्काळ संबंधित सर्व मॅनेजमेंट संस्थांना विद्यार्थ्यांना प्रवेश देताना विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठीच्या कागदपत्रांची कसुन पडताळणी करावी आणि त्याबाबत सतर्क व सावध राहण्याबाबत कळविण्यात आले.

काही विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अपलोड केलेल्या गुणांच्या माहितीची देशपातळीवरील विविध संस्थांकडून MAT (AIMA), CMAT (AICTE) ATMA (AIMS) and XAT (XLR) इत्यादी प्रवेश परीक्षा घेतलेल्या संस्थांकडून प्राप्त गुणांशी पडताळणी करण्यात आली त्यावेळी काही विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये त्रुटी आढळून आल्या.

तदनंतर या कक्षाने संबंधित परीक्षा घेणाऱ्या संस्थांशी संपर्क साधुन पाच हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या गुणांची पडताळणी केली. नंतर कक्ष अचुकतेने त्रुटी निवारण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती पडताळणी करीत आहे. प्राथमिक पडताळणी अंती AIMS ने घेतलेल्या ATMA परीक्षेच्या आधारे प्रवेश घेणाऱ्या १६८ विद्यार्थ्यांचे गुण प्रवेशास ग्राहय धरता येणार नाही असे प्रकर्षाने निदर्शनास आले. तसेच MAT (AIMA), परीक्षा दिलेल्या ११ विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना चुकीचे पर्सेंटाईल स्कोअर भरल्याचे आढळून आलेले आहे. चौकशी व प्राप्त माहितीच्या आधारे प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ATMA (AIMS) परीक्षा दिलेल्या १६८ विद्यार्थ्यांपैकी व MAT (AIMA) परीक्षा दिलेल्या ११

Admissions Regulating Authority, Mumbai
Maharashtra State

विद्यार्थ्यांपैकी (एकुण १७९ विद्यार्थ्यांपैकी) केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेरी क्र. १ प्रमाणे एकुण ११४ विद्यार्थ्यांना सीट अलॉट झालेली असून त्यांना या संदर्भात या कक्षामार्फत् कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तदनंतर सदर चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २६ जुलै, २०१९ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने AIMS उर्वरीत १३८ विद्यार्थ्यांना ज्यांची ATMA चे गूण हे चुकीचे आहेत अशांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे

अशा विद्यार्थ्यांनी कारणे दाखवा नोटीसीला उत्तर दिल्याप्रमाणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने अर्जात भरलेल्या माहितीची संबंधित संस्थेकडून तपाराणी केली सदर बाबतीत विद्यार्थ्यांने चुकीची माहिती भरलेली असल्यास एजन्सीकडून प्राप्त अभिलेखानुसार अचूक माहिती प्रवेश प्रक्रियेसाठी अदयावत करण्यात आली आहे. एकुण १८९ विद्यार्थ्यांची माहिती जुळून आली नाही आणि अशा विद्यार्थ्यांनी कारणे दाखवा नोटीसीस उत्तर दिलेले नसून अशा विद्यार्थ्यांना दिनांक २९/०७/२०१९ रोजी गुणवत्ता यादीमधुन वगळण्यात आलेले आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांनी नामांकीत संस्थेत ATMA (AIMS) बनावट कागदपत्रांच्या आधारे घेतलेला प्रवेश रद्द केलेला असून संबंधित संस्थांमार्फत कायदेशीर कार्यवाही सुरु केलेली आहे. उर्वरीत विद्यार्थी ज्यांनी इतर संस्थेत प्रवेश घेतला असून ATMA किंवा MAT चा स्कोर चुकीचा भरलेला आहे अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश सुध्दा रद्द करण्यात आलेले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या तंत्रशिक्षण विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या एम.बी.ए/एम.एम.एस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अचुकपणे राबविण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी योग्य ती काळजी घेण्यात येत आहे. यापुढे चुकीच्या पध्दतीने अर्ज करणाऱ्या अर्जदारांवर शिस्तभंगाची व कायदेशीर कार्यवाही या कक्षाकडून कटाक्षने करण्यात येईल.

चौकशी समितीचा सांख्यिकी तक्ता खाली नमुद केला आहे.

MAT आणि ATMA मध्ये अभिलेखात त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांचा सांख्यिकी तक्ता

| अ.क्र | तपशिल | MAT | ATMA |
|---|---|---|---|
| १ | अर्जदार | ९५७ | ४१४६ |
| २ | दिनांक २३/०७/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस | ३७ | ७७ |
| ३ | स्पष्टीकरण/सुधारणा | ३७ | ०१ |
| ४ | दिनांक २३/०७/२०१९ रोजी गुणवत्ता यादीतुन वगळण्यात आले. | ०० | ७६ |
| ५ | दिनांक २६/०७/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस | -- | १३८ |
| ६ | स्पष्टीकरण/सुधारणा | -- | २७ |
| ७ | दिनांक २९/०७/२०१९ रोजी गुणवत्ता यादीतुन वगळण्यात आले. | -- | १११ |

Admissions Regulating Authority, Mumbai
सत्यमेव जयते
Maharashtra State

| अ.क्र | तपशिल | MAT | ATMA | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | कारणे दाखवा | ३७ | २१५ | २५२ |
| २ | एकुण बदल | ३७ | २८ | ६५ |
| ३ | गुणवत्ता यादीतुन वगळण्यात आलेल्यांची संख्या | ०० | १८७ | १८७ |